गुहागर-बोरिवली एसटी कलंडली

वार्ताहर

पोलादपूर, दि. १५ - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गुहागर आगाराची गुहागर-बोरिवली एसटी बस पोलादपूर शहरातील ग्रामदैवत श्रीकाळ भैरवनाथ मंदिराच्या कमानीजवळ एल अँड टीने खोदलेल्या चरात कलंडली. सुदैवाने सर्व प्रवासी सुखरूप असल्याची माहिती आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-६६ च्या चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर असताना ठेकेदार कंपनी लार्सन अँड टूब्रोने शहरातील ग्रामदैवत श्रीकाळ भैरवनाथ मंदिराच्या कमानीजवळ खोदकाम करून खणलेल्या चरांमुळे महामार्गाची साईडपट्टी अरुंद झाली आहे. मंदिरालगतच रयत शिक्षण संस्थेचे विद्यामंदिर पोलादपूर असल्याने या ठिकाणी रम्बलर स्ट्रीप्सचे गतिरोधकही आहेत. या ठिकाणी सकाळी सव्वाअकराच्या सुमारास गुहागर-बोरीवली एसटी बस साईडपट्टी नसलेल्या ठिकाणी एलऍण्डटीने खोदलेल्या चरात कलंडली.

सुदैवाने सर्व प्रवासी बचावले

हा अपघात झाला तेव्हा याठिकाणी म्हशी आणि गुरे राष्ट्रीय महामार्गावरून जात असल्याचे काही प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. एका प्रवाशाने एसटी चालक बाटलीतून पाणी पित असल्याचे सांगितले. तर चालक मोबाईलवर बोलत असल्याचे दिसून आल्याचे अन्य काही प्रवाशांचे म्हणणे आहे. दरम्यान, अकरा वाजता पोलादपूर स्थानकात आलेली ही बस स्थानकातील प्रवासी घेऊन निघाली असता चालक नागरे हे बस चालवत होते. या वेळी नव्याने बसलेल्या प्रवाशांची तिकीटे काढण्याचे काम वाहकांकडून सुरू असताना हा अपघात झाल्याने प्रवाशांना मुका मार बसल्याचे दिसून आले.

या अपघाताचे वृत्त कळताच सहायक पोलीस निरिक्षक प्रकाश पवार, पोलीस नाईक राज पवार तसेच कर्मचारी आणि पोलादपूरचे नगरसेवक उमेश पवार आणि सहकाऱ्यांनी तातडीने मदत केली.

बुद्ध पौर्णिमेला वन्यप्राणी प्रगणना

प्रतिनिधी

नागपूर, दि. १५ - बुद्धपौर्णिमेच्या दिवशी येत्या १८ मे रोजी वन्यप्राण्यांची प्रगणना करण्यात येणार असून याकरिता वनविभाग सज्ज झाला आहे. वर्धा जिल्ह्यातील आठ वनपरिक्षेत्रात कृत्रिम व नैसर्गिक पाणवठ्यांच्या परिसरात तब्बल ८४ मचाणांची व्यवस्था करण्यात आली आहे.

दरवर्षी संपूर्ण देशात बुद्धपौर्णिमेच्या दिवशी चंद्राच्या प्रकाशात वन्यप्राण्यांच्या प्रगणनेचा उपक्रम वनविभागाकडून आयोजित केला जातो. या दिवशी १८ मे ला सायंकाळी ४ वाजता प्रगणनेला सुरुवात होईल. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता प्रगणना समाप्त होईल.

याकरिता जिल्ह्यातील ८ वनपरिक्षेत्रात एकूण ८४ मचाणांची व्यवस्था वर्धा वनविभागातर्फे करण्यात आली आहे. प्रगणननेत सहभागी होण्याकरिता बुधवार अखेरचा दिवस असून वनविभागात आवेदन करता येणार आहे. अवादेनाच्या पडताळणीनंतर मचाणाच्या स्थळाचे वितरण होणार आहे.

हल्दीराम रेस्टॉरंटच्या वडा-सांबारमध्ये पालीचे मेलेले पिल्लू

प्रतिनिधी

नागपूर, दि. १५ - नागपुरच्या हल्दीराम रेस्टॉरंटमध्ये वडा-सांभारामध्ये पालीचे पालीचे मेलेले पिल्लू आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात दोन जणांची प्रकृती बिघडली असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. अन्न आणि औषधी प्रशासनाकडे तक्रार नोंदवली असून प्रशासन हल्दीराम विरुद्ध काय कारवाई करेल याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. यासंदर्भात तक्रारदार अग्निहोत्री कुटुंबीयांशी संपर्क केला असता त्यांनी आणि रुग्णालय प्रशासनाने काहीही बोलण्यास नकार दिला आहे.

अग्निहोत्री कुटुंबातील दोन सदस्य वर्धा रोडवरील हल्दीराम रेस्टॉरंटमध्ये नाश्ता करण्यासाठी गेले होते. त्यांनी वडा सांभारची ऑर्डर दिली. वडा सांभारची खात असतांनाच सांभारामध्ये मेलेल्या पालीचे पिल्लू आढळून आले. ही बाब त्यांनी लगेच हॉटेल प्रशासनाला सांगितली. या दरम्यान वडा सांबार खाल्यामुळे दोघांची प्रकृती बिघडली. दोघांना उपचाराकरिता रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. या दरम्यान अग्निहोत्री कुटुंबाने अन्न आणि औषधी विभागाकडे तक्रार केली. या तक्रारीवर प्रशासन काय कारवाई करते याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

यासंदर्भात तक्रारदार असलेल्या दोघांशी संपर्क केला असता त्यांनी यावर बोलण्यास स्पष्ट नकार दिला आहे. अन्न आणि औषधी प्रशासन विभागाचे आयुक्त नागपूर बाहेर असल्याने त्यांनीदेखील चौकशीचा अहवाल आल्याशिवाय प्रतिक्रिया देता येणार नाही, असे सांगितले.

एका प्रतिष्ठित ब्रँडच्या आऊलेटमध्ये हा प्रकार समोर आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. एका प्रतिष्ठित ब्रँडच्या आऊलेटमध्ये हा प्रकार समोर आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

१८ आणि १९ मे रोजी विविध उपक्रमातून 'वसई विजय दिन' होणार साजरा

वार्ताहर

वसई, दि. १५ - पोर्तुगीजांच्या परकीय जुलमी राजवटीला त्रस्त झालेल्या वसईकरांच्या हाकेला श्रीमंत नरवीर चिमाजी आप्पा पेशवे धावून आले. मराठा सैन्याने पराक्रमाची पराकाष्ठा करून वसईची ऐतिहासिक लढाई जिंकली. तो १९ मे हा दिवस वसई विजयोत्सव दिन म्हणून साजरा केला जातो.

यंदाचा २८१ वा 'वसई विजय दिन' दि. १८ आणि १९ मे २०१९ असे दोन दिवस विविध उपक्रमातून वसईच्या किल्ल्यात साजरा करण्यात येणार आहे.

वसई विरार महानगरपालिका, आमची वसई व शूर्पारक-वसई इतिहास व संस्कृती गौरव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वसई विजयोत्सव साजरा केला जाणार आहे.

महापालिकेतर्फे नरवीर चिमाजी आप्पांचे स्मारक पूजन व आप्पांच्या अश्वारूढ पुतळ्यास यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत मानवंदना देण्यात येणार आहे.

यंदा निवडणूक आचारसंहिता असल्याने वसई तालुका कला क्रीडा महोत्सव आणि चिमाजी आप्पा स्मारक समितीच्या माध्यमातून साधेपणाने विजय दिन साजरा केला जाणार असल्याचे प्रकाश वनमाळी यांनी सांगितले.

आमची वसई तर्फे दुर्ग-दर्शन, दुर्ग-भ्रमंती व इतिहास मार्गदर्शनाचा उपक्रम आणि एकंदर वसई विजयोत्सव जल्लोषात राबविण्यात येणार असल्याचे राजेंद्र ढगे यांनी सांगितले.

रेल्वेगाडीतून पडल्याने युवकाचा मृत्यू

प्रतिनिधी

नागपूर, दि. १५ - अमरावती-पुणे एक्स्प्रेस या रेल्वेगाडीतून पडल्याने गंभीर जखमी झालेल्या युवकाचा मृत्यू झाला. रात्री उशीरापर्यंत मृतकाची ओळख पटू शकली नाही. ही घटना वाशीम जिल्ह्यातील जऊळका रेल्वे या स्थानकाजवळ घडली.

सोमवार, १३ मे रोजी रात्रीच्या सुमारास या रेल्वेगाडीतून ३५ वर्षे वयोगटाचा युवक पडून गंभीर जखमी झाला. नांगरणीसाठी शेतात गेलेल्या एका ट्रॅक्टरचालकाला तो दिसून आला. त्याला तातडीने उपचारासाठी वाशीम येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले होते. परंतु, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

या घटनेने परीसरात हळहळ व्यक्त होत आहे.

हदगावात घरगुती वादातून पत्नीची हत्या

प्रतिनिधी

नागपूर, दि. १५ - घरगुती वादातून पतीने कुऱ्हाडीचे घाव घालून पत्नीची हत्या केली. यवतमाळ जिल्ह्याच्या बोरी अरबजवळील हदगाव येथे सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

सोनू युवराज कचरे असे मृतक महिलेचे नाव आहे. युवराज भीमराव कचरे असे आरोपीचे नाव आहे.

सकाळी पती आरोपी युवराज कचरे याच्यासोबत वाद झाल्यानंतर सोनू शेताकडे निघाली होती. संतापलेल्या पतीने तिला शेतशिवारात एकटी गाठून तिच्या मानेवर कुऱ्हाडीने घाव घातले. या हल्ल्यात तिचा जागेवरच मृत्यू झाला. या घटनेची माहिती ग्रामस्थांनी लाडखेड पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच लाडखेड पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. मृतक महिलेचा १० वर्षांचा मुलगा व ७ वर्षांची मुलगी आहे.

ही घटना घरगुती वादातूनच घडल्याचे सांगण्यात येत आहे. याप्रकरणी लाडखेड पोलिसांनी आरोपी पती युवराज कचरे याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे.

अंबरनाथ शहरातही पाणीप्रश्न गंभीर झाला आहे. येथेही महिला घोटघर पाण्यासाठी डोक्यावर हंडे ठेवून पूर्वेकडील एमआयडीसीकडे जाणाऱ्या अत्यंत रहदारीच्या लोकनगरी येथील रस्त्यावर आपला जीव धोक्यात घालून पायपीट करत असल्याचे नजरेस पडत आहे. (छाया : मनोज जगताप)

कुडशेत गावाचे पाण्याचे स्त्रोत आटले

पाण्यासाठी दिड किलोमीटरची पायपीट

वार्ताहर

शहापूर, दि. १५ - शहापुर तालुक्यातील पाण्याचे स्त्रोत आटल्याने सध्या अनेक गावपाड्यातील नागरिकांना दूरवरून पाणी आणावे लागत आहे.

कुडशेत तालुक्यातील कुडशेत या डोंगर पठारावर व वरच्या बाजूने सपाट दिसणाऱ्या परिसरात वसलेला चारशेच्या आसपास लोकसंख्या असणारा हा पाडा आहे. पूर्वी १५ ते २० पाझर बंधारे बांधण्यात आले. एकापाठोपाठ असे बांधण्यात आलेले हे बंधारे डोंगरांच्या कुशीत असल्याने हे तलाव बारमाही भरून राहू लागल्याने या परिसरातील आदिवासी लोकांना त्याचा फायदा झाला. बंधाऱ्यातील पाण्यावर आदीवासी मोठ्या प्रमाणात भाजीपाला घेऊन उत्पन्न मिळवू लागले त्यामुळे त्यांना याचा चांगला फायदा झाला आहे.

मात्र यावर्षी पाऊस लवकर गेल्याने हेच ओढे नाले लवकर सुकल्याने या तलावात वाहणारे पाणी लवकरच कमी होत गेले. पाऊस लवकर गेल्याचा परिणाम असा झाला या पैकी अनेक बंधारे कोरडे ठाक झाले आहेत. गावात असणाऱ्या विहिरीही सुकून गेल्या आहेत. या पाड्यातील नागरिकांना पाण्यासाठी दीड किलोमीटर अंतर पार करावे लागत आहे. हे पाणी आणताना पायवाट तीही हे आदीवासी लोक अनवाणी तुडवत पाणी आणत आहेत.

गावाजवळ असणाऱ्या विहिरीत तर चक्क खड्डे खोदण्यात आले असून या शिडीवरून नागरिक उतरून त्या खड्ड्यातील पाणी इतर कामासाठी वापरत आहेत. येत्या काही दिवसात हे सर्व बंधारे आटून या पाड्यांवर तीव्र पाणी टंचाई निर्माण होणार असल्याची स्थिती निर्माण होत आहे.

गावाच्या परिसरात असणारे अनेक बंधारे आटले असल्याने विहिरी कोरड्या पडल्या आहेत. येत्या काही दिवसात या परिसरात तीव्र पाणी टंचाई निर्माण होईल अशी अवस्था झाली आहे

- कल्पना यशवंत शिंदे

या परिसरात लघु पाटबंधारे विभागाचे वतीने अनेक बंधारे बांधण्यात आले आहेत. त्यामध्ये पाणी राहायचे, मात्र यावर्षी पाऊस लवकर गेल्याने ते आटत आहेत.

- एस. दुसाने
लघु पाटबंधारे विभागाचे इंजिनियर

नागपुरातील स्मार्ट शहर वाहतुकीसाठी 'टीएफएल'ची मदत

नागपूर, दि. १५ (प्रतिनिधी) - इंग्लंडमधील सार्वजनिक वाहतूक जगभरात सर्वोत्तम मानली जाते. एमओयूबेटीव्हन ट्रान्सपोर्ट फॉर लंडन (टीएफएल) यांच्या सहकार्याने हिंदुस्थानातील वाहतूक यंत्रणा सक्षम केली जाणार आहे. यासाठी भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभागाने टीएफएल यांच्याशी करार केला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात भारतातील पाच शहरात पायलट प्रोजेक्ट राबविला जाणार आहे.यात मुंबई, पुणे, नाशिक व नागपूर तसेच आंध्र प्रदेशातील विजयवाडा आदी शहरांचा समावेश आहे. सार्वजनिक वाहतुकीसंदर्भातील अडचणी व उपाययोजनांचे आदानप्रदान करण्याच्या हेतूने टीएफएल व महापालिकेच्या परिवहन विभागातील अधिकाऱ्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून संवाद साधला.टीएफएलचे शिष्टमंडळ नागपूर दौऱ्यावर येणार असल्याची माहिती देण्यात आली. वाहतूक व्यवस्थेच्या गतिशीलता आणि कार्यक्षमतेवर तसेच नियोजन व वितरण आदी समस्यांवर संवाद साधला जाणार आहे.

कन्हान नदीत बुडून तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी

नागपूर, दि. १५ - आंघोळीसाठी नदीवर गेलेल्या तरुणाचा बुडून मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना नागपूर जिल्ह्यातील मौदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कन्हान नदीवर उघडकीस आली. अक्षय दीपक शेंडे असे मृतकाचे नाव आहे. अक्षय जन्मत:च मुका होता. परंतु तो दारूच्या आहारी गेला. १३ मे रोजी तो सायंकाळी सात वाजता घरून निघाला. परंतु रात्र होऊनही तो घरी परतला नव्हता. त्यामुळे अक्षयचा मोठा भाऊ आकाश शेंडे याने अक्षयला दारू पिण्याची सवय आहे. दारू पिल्यानंतर तो कन्हान नदीवर आंघोळीला जातो. तीनचार वर्षांपूर्वी आपल्या वडिलांचे फिटच्या आजाराने निधन झाले, असे त्याने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले. याप्रकरणी पोलिसांनी तक्रार नोंद करून तपास सुरू केला.

दरम्यान दुपारच्या सुमारास कन्हान नदीच्या पात्रातील वॉटर फिल्टरच्या खाली अक्षयचा मृतदेह आढळून आला. अक्षयच्या नाकातोंडातून रक्त निघत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हा घातपात तर नाही, अशी शंका आहे. अक्षयच्या पश्चात आई व मोठा भाऊ आकाश आहे. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

NOTICE

BAYER CROPSCIENCE LTD

REGD OFFICE : BAYER HOUSE, CENTRAL AVENUE, HIRANANDANI ESTATE, THANE (W), MUMBAI-400607

Notice is hereby given that the certificate for the under mentioned securities of the Company has been lost / misplaced and the holder of the said securities has applied to the Company to issue duplicate certificate.

Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the company at its registered office within 15 days from this date, else the company will proceed to issue duplicate share certificate without further intimation. Name of the holder: **Prasun Paul**, Kind of Securities & Face Value: Equity Shares of Rs.10/- each, No. of Securities: 200, Distinctive Nos. 16861320-16861519.

Place: Kolkata
Date: 16 May 2019

Applicant:
Prasun Paul

युनी ॲबेक्स् अलॉय प्रॉडक्ट्स लि.

लिबर्टी बिल्डिंग, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-४०० ०२०.
ईमेल: companysecretary@uniabex.com
संकेतस्थळ: www.uniabex.com
दू. +९१-२२-२२०३२७९७
सीआयएन:एल२७१००एमएच१९७२पीएलसी०१५९५०

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन २०१५ (एलओआरडी) च्या रेग्युलेशन २९ आणि ४७ अन्वये याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजीस संपलेल्या तिमाही आणि वित्तीय वर्ष समाप्तीकरिता कंपनीच्या लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांना इतर बाबींसह विचारात मंजूर आणि पटलावर घेण्यासाठी आणि समभाग शेअर्सवर काही असल्यास अंतिम लाभांशाची शिफारस करण्यासाठी **मंगळवार, २८ मे, २०१९** रोजी घेण्यात येणार आहे.

वरील सभेचे परिणाम कंपनीचे संकेतस्थळ म्हणजेच www.uniabex.com आणि स्टॉक एक्सचेंज चे संकेतस्थळ म्हणजेच www.bseindia.com यावर उपलब्ध असणार आहे.

युनी ॲबेक्स् अलॉय प्रॉडक्ट्स् लि. करिता
सही/-
एम.एस. अशर
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

ठिकाण: मुंबई.
दिनांक: १५ मे, २०१९

जाहीर नोटीस

या नोटीस द्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते की गांव मौजे बोईसर, तालुका पालघर, जिल्हा पालघर, येथील सर्वे नं.५५, हिस्सा नं. २/२, क्षेत्र हे.आर.प्र. ०.२९.००, आकार रु.पै. ०.२५, असलेली संपूर्ण मिळकत **१. मंजू रमाशंकर पांडे २. रमाशंकर एस. पांडे** यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची होती व त्यांनी सदर मिळकत **श्री सिकंदर मोहम्मद रजा रसूल शाह** व इतर यांना विकत दिली होती व त्यांनी सदर मिळकतीपैकी क्षेत्र सुमारे **२० गुंठे** खुली जागा माझे अशील यांना विकत देण्याचे मान्य व कबुल केले आहे तरी सदर मिळकतीवर कोणाचा गहान, दान, करार किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार किंवा हितसंबंध असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत सर्व पुरविण्याशी लेखी, **एल डी यादव वकील** शॉप नं. १८, साई बाजार, तुळींज रोड, तुळींज पुलिस स्टेशन मागे,नालासोपारा (पूर्व), ता. वसई, जि. पालघर ४०१२०९, ह्या पत्त्यावर कळवावे, अन्यथा तसा कोणाचाही, कोणताही हक्क, अधिकार, किंवा हितसंबंध नाही व असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून माझे अशील त्यांचेबरोबर पुढील व्यवहार पूर्ण केला जाईल यांची नोंद घ्यावी.

सही/-
एल. डी. यादव वकील

GARWARE MARINE INDUSTRIES LIMITED
CIN: L12235MH1975PLC018481
Regd. Office: 102, Buildarch Wisteria, 1st Floor, Ram Maruti Road, Dadar (West), Mumbai -400028

NOTICE

Notice is hereby given pursuant to SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation, 2015, that a meeting of the Board of Directors of the Company will be held on **Thursday, 23rd May, 2019,** inter alia, among other matters, to consider, approve and to take on record the Audited Financial Results of the Company for the quarter and year ended 31st March, 2019.

The information contained in this notice is also available on the Company's website www.garwaremarine.com and on the website of Stock Exchange i.e. www.bseindia.com.

For **Garware Marine Industries Limited**
Sd/-
Pallavi P. Shedge
Company Secretary

Place: Mumbai
Date : 15.05.2019

टेक्नोजेट कन्सलटंट्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : नेविल हाउस, जे. एन. हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१
दूर. : ९१ २२ २२६१ ८०७१,
फॅक्स : ०२२ ६७४९५२००
सीआयएन : L74210MH1982PLC027651
प्रशासकीय कार्यालय : सी-१, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०२५.
दूर. : ९१ २२ ६६६२ ००००
वेबसाईट : www.technojet.in
ईमेल : technojetconsultantslimited@gmail.com

सूचना

सिक्युरिटीज अँन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ४७ सहवाचन विनियमन २९ अंतर्गत याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाकरिता कंपनीच्या लेखापरीक्षित वित्तीय अहवालांवर विचारविनीमय करणे व त्यांना मान्यता देण्याकरिता टेक्नोजेट कन्सलटंट्स लिमिटेडच्या संचालक मंडळाची सभा सोमवार, २७ मे, २०१९ रोजी आयोजित करण्यात येत आहे. सदर सूचनेची माहिती कंपनीची वेबसाईट www.technojet.com वर तसेच स्टॉक एक्सचेंज वेबसाईट www.bseindia.com वर उपलब्ध आहे.

टेक्नोजेट कन्सलटंट्स लिमिटेडकरिता
सही/-
अमिशा राजपुत
कंपनी सचिव

दिनांक : १५.०५.२०१९
ठिकाण : मुंबई

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that **MRS. GARIMA DHARMESH THAKKAR** has agreed to sell to my client the premises more particularly described in the Schedule written.

All persons having any right, title, claim or interest in respect of the premises by way of sale, exchange, mortgage, charge, gift, trust, inheritance, possession, lease, lien, maintenance, easement, device, bequest, encumbrance or otherwise however are hereby requested to make the same known in writing along with documentary proof to the undersigned at his office address **Shop No. 109, 1st floor, Crystal Shoppers Paradise, Junction of 24th and 33rd Road, Bandra (W), Mumbai – 400 050** within 10 days from the date hereof, failing which any such claims shall be disregarded and shall deemed to have been waived and/or abandoned.

SCHEDULE

Forty One Fully paid up Shares of Rs. 50/-(Fifty) each bearing Nos. 1969 to 2009 (both inclusive) as per Share Certificate No. 49 dated 26-09-1968 and 123 dated 16-07-2012 issued by **SURAJ CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED,** along with Flat No. 49 admeasuring about 486 Sq. feet built up area on the third floor of the Wing B of the building, lying on Plot bearing **C.T.S. No. 1011** of Village Juhu, Taluka Andheri and situated at Anand Nagar, Kishore Kumar Ganguly Marg, Juhu Tara Road, Mumbai – 400 049 in the Registration District and Sub-District of Mumbai City and Mumbai Suburban.

Mahesh L. Motwani
Advocate

Date : 16 May 2019

जाहीर सूचना

फॉर्म क्र. यूआरसी-२
प्रकरण XXI च्या भाग १ अंतर्गत नोंदणीकरणाकरिता अंदाजे जाहिरात देणारी सूचना (कंपनी (रजिस्टरचे प्राधिकरण) नियम, २०१४ च्या कंपनी कायदा, २०१३ व नियम ४(१) च्या अनुच्छेद ३७४ (बी) अंतर्गत)

१. सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ३६६ च्या उप-अनुच्छेद (२) च्या तरतुदीअंतर्गत व कंपनीचे निबंधक, मुंबई, महाराष्ट्र येथील रजिस्ट्रारद्वारे किंग कावेरी ट्रेडिंग कंपनी, भागीदारी संस्था यांच्या अंतर्गत शेअर्सद्वारे कंपनी लिमिटेड म्हणून कंपनी कायदा, २०१३ च्या प्रकरण XXI च्या भाग १ अंतर्गत तीस दिवसांच्या पूर्ततेपूर्वी वा पंधरा दिवसांच्या नंतर नोंदणीकृत करून अर्ज दाखल करण्यात आला आहे.

२. प्रस्तावित कंपनीच्या मुख्य विषय म्हणून खालीलप्रमाणे : प्रस्तावित कंपनी इम्पोर्ट, एक्सपोर्ट, विक्री, ट्रेड, ट्रेलर्स/सेमी ट्रेलर्सची वा भागाची दुरुस्तीचे व्यवसाय पार पाडण्यात येतील.

३. संघटनेच्या मसुद्याची ड्राफ्टची प्रत व प्रस्तावित संघटनेच्या मसुद्याची प्रत प्रस्तावित कंपनी कार्यालय पत्ता कार्यालय ए-१९/१, मैत्री पार्क, सायन-ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१ येथे पडताळणी करावी.

४. सूचना याद्वारे देण्यात येते की, कोणाही व्यक्तीस सदर अर्जासंबंधात कोणतेही आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप लेखी स्वरूपात सेंट्रल रजिस्ट्रेशन सेंटर (सीआरसी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (आयआयसीए), प्लॉट क्र. ६, ७, ८, सेक्टर ५, आयएमटी मानेसार, जिल्हा गुडगाव (हरयाणा), पिन कोड १२२ ०५० येथे एकवीस दिवसांच्या आत सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून त्यांच्या नोंदणीकृत कार्यालय येथे सदर कंपनीची प्रत प्राप्त करता येईल.

दि. १५ मे, २०१९

अर्जदारांचे नाव
१. सुरेश कुमार अरोरा
२. शशिकांत कुंभार

फॉर्म क्र. आइएनसी-२६
(कंपनी (समाविष्ट) नियम २०१४ च्या नियम ३० अंतर्गत)
केंद्र सरकार समक्ष
क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, मुंबई
कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १३ च्या उप-अनुच्छेद (४) अंतर्गत प्रकरणी व कंपनी (समाविष्ट) नियम, २०१४ च्या नियम ३० च्या उप-नियम (५) अंतर्गत आणि
लितुरा एनर्जी सल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणी (सीआयएन : U31901MH2011PTC217409) त्यांचे नोंदणीकृत कार्यालय पत्ता **कार्यालय क्र. २९, अंबिका टॉवर, बी विंग, तळमजला, राजमाता जिजाबाई रोड, आघाडी नगरसमोर, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०९३, महाराष्ट्र**

..... याचिकाकर्ते

आम जनतेस सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनी महाराष्ट्र राज्यामधून हरयाणा राज्यामध्ये सदर त्यांचे नोंदणीकृत कार्यालय बदलण्याकरिता कंपनीस सक्षम करण्यास दि. ३० एप्रिल, २०१९ रोजी आयोजित केलेल्या अति विशेष वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये विशेष ठराव मंजूर करण्याच्या हेतुने कंपनीच्या संघटनेच्या मसुद्यामध्ये सुधारांची पुष्टी करण्याकरिता कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १३ अंतर्गत केंद्र सरकारकडे अर्ज करण्याचा प्रस्ताव करत आहे.

कोणीही व्यक्ती कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाचे सदर हस्तांतरणा संबंधात इच्छुक असल्यास सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून चौदा दिवसांच्या आत खालील नमूद नोंदणीकृत कार्यालय येथे अर्जदार कंपनीची प्रतसह सदर सूचना **एमसीए-२१ पोर्टल www.mca.gov.in येथे सदर गुंतवणूकदार तक्रार प्रपत्र** पाठवावे वा त्यांचे नोंदणीकृत पोस्ट सदर सूचनेच्या हितसंबंधांचे वा आक्षेपांचे प्रपत्र क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालय, एव्हरेस्ट ५ वा मजला, १०० मरिन ड्राईव्ह, मुंबई - ४०० ००२ येथे अर्जदार कंपनीच्या प्रत समवेत खालील नमूद पत्त्यावर कॉर्पोरेट कार्यालय येथे पाठवावी.

कार्यालय क्र. २९, अंबिका टॉवर, बी विंग, तळमजला, राजमाता जिजाबाई रोड, आघाडी नगरसमोर, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०९३, महाराष्ट्र
लितुरा एनर्जी सल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडकरिता
सही/-
अरविंद द्वीवेदी
संचालक
डीआयएन : ०७२९२२३०

दि. १४.०५.२०१९
ठिकाण : मुंबई

क्रिश्ना व्हेंचर्स लिमिटेड

७ वा मजला, कॉर्पोरेट सेंटर, हॉटेल विटस् समोर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९
फोन : +९१ २२ २८२६९५६८/६९/६१८९८०००, फॅक्स : +९१ २२ ६१८९८०९९
www.krishnaventures.com, ईमेल : corporate@krishnaventures.com
सीआयएन : एल४५४००एमएच१९८१पीएलसी०२५१५१

वृत्तपत्र सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन २९ सहवाचता रेग्युलेशन ४७ अनुसार कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ही ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेली तिमाही आणि वित्तीय वर्षाकरिता कंपनीचा लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष आणि अध्यक्षांच्या परवानगीने अशा अन्य बाबी इतर बाबींसह विचारात, मंजुर आणि अभिलिखित करण्यासाठी ७ वा मजला, कॉर्पोरेट सेंटर, हॉटेल विटस् समोर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५८ येथील कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात शनिवार २५ मे, २०१९ रोजी घेण्याचे नियोजित आहे.

सदर माहिती कंपनीची वेबसाईट **www.krishnaventures.com** आणि कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध असलेल्या स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट **www.bseindia.com** वर सुद्धा उपलब्ध आहे.

क्रिश्ना व्हेंचर्स लिमिटेड करिता
सही/-
अमिता राऊत
कंपनी सचिव नि अनुपालन अधिकारी

ठिकाण : मुंबई
दिनांक : १५.०५.२०१९

The *spirit of* Mumbai *is now*
91 years old!

FREE PRESS JOURNAL

NATION | WORLD | POLITICS | SPORTS | EDUCATION | BUSINESS | ENTERTAINMENT

The Family Newspaper

www.freepressjournal.in